**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि.**
**कोकण परिमंडळ कार्यालय**
**ग्राहक तक्रार निवारण मंच रत्नागिरी**

---

**ग्राहक तक्रार क्र. ६७/२०१०** **दि. ०९.१२.२०१०**

| | |
|---|---|
| **श्री.रोहीत अरविंद कोळवणकर.**<br>**मु.पो. जाकादेवी - खालगाव ,**<br>**ता.जि. रत्नागिरी.** | **तक्रारदार ग्राहक** |

**विरुध्द**

| | |
|---|---|
| **कार्यकारी अभियंता 'महावितरण'**<br>**स व सु विभाग,**<br>**रत्नागिरी डिव्हिजन.** | **विरुध्द पक्षकार** |
| **फोरम उपस्थिती** | **१) श्री. डी. एस्. जामखेडकर**<br>**अध्यक्ष**<br>**२) श्री. व्ही.बी.जगताप**<br>**कार्यकारी अभियंता**<br>**३) श्री.एन्.ए.कुलकर्णी**<br>**सदस्य** |
| **ग्राहकाच्या वतीने** | **प्रतिनिधी**<br>**श्री. अमित अरविंद कोळवणकर.**<br>**मु.पो.जाकादेवी - खालगाव**<br>**ता.जि.रत्नागिरी.** |

**विरुध्द पक्षकाराच्या वतीने**

**१) श्री.एस्.पी.देशपांडे.**
**उपकार्यकारी अभियंता,**
**रत्नागिरी विभागीय कार्याल**

**२) श्री.आर.व्ही.पोतदार**
**सहाय्यक अभियंता,**
**उपविभाग - जाकादेवी,रत्नागिरी.**

**महाराष्ट्र राज्य वीज नियामक आयोग ग्राहक तक्रार निवारण मंच व लोकपाल(ओम्बुडस्मन) विनिमय २००३ मधील ८(२) चे तरतुदीनुसार :**

श्री.रोहीत अरविंद कोळवणकर गट क्र.६०९, राहणार माचिवले वाडी, पो.तरवळ, ता/जि - रत्नागिरी यांची 3HP कृषीपंप जोडणी अद्याप न दिल्याबंद्दलची तक्रार दि.०९.१२.२०१० रोजी आवश्यक त्या तपशिलासह दाखल झालेली आहे. अर्ज केल्यानंतर एक वर्षोहुन अधिक काळ विलंब झाला असल्याने तक्रार मंचाकडे दाखल झाली असून ती नियमानुसार आहे. सदर प्रकरणाची सुनावणी दि.१२.०१.२०११ रोजी घेण्यात आली असता उभयबाजुंनी उपस्थित राहून आपला युक्तीवाद करण्यात आला आणि आवश्यक तो तपशिलही दाखल करण्यात आला.

तक्रार प्रकरणाच्या सुनावणीत ग्राहकाच्या वतीने स्पष्ट करण्यात आले की दि.०३ मार्च २००९ रोजी शेतीपंप जोडणीकरीता अर्ज दाखल करण्यात आला असता, सदरहु जोडणीस मंजुरी दि.२०.०७.२००९ रोजी देण्यात येवून रु.५०५०/- कोटेशन देण्यात आले असता सदर कोटेशन २७.०७.२००९ रोजी पावती क्र.४५११५५३ नुसार भरण्यात आले. कोटेशन भरुन झाल्यानंतर कोणतीच कार्यवाही करण्यात आली नाही. तथापी सातत्यांने पाठपुरावा केल्यानंतर महावितरणकडून दि.०६.०२.२०१० च्या पत्रानुसार Non-DDF आणि CCRF योजनेनुसार स्वखर्चाने जोडणी उभारण्यात यावी कि ज्याचा खर्च वजावटीच्या स्वरुपात देण्यात येईल असे कळविण्यात आले. पण हे शक्य नसल्याने अशी संमती देण्यात आली नाही. आणि महावितरणकडून पुन्हा दि.०७.०५.२०१० च्या पत्रानुसार कळवण्यात आले की, सदरहु कनेक्शन बॅकलॉग योजने अंतर्गत असून या जोडणीकरीता विद्युत वाहीनी उभारणी, रोहीत्र उभारणी इ.करावे लागणार आहे. रोहीत्राचे काम आणि ठेकेदाराची कामाची गती यामुळे आपल्या कामास विलंब लागू शकतो. तथापी यानंतर पुढील कोणतीही कृती करण्यात आलेली नसून, संपर्कही करण्यात आलेला नाही. सबब कृषीपंपाच्या वीजजोडणीबाबत त्वरीत आदेश द्यावा आणि विलंबाबद्दंल भरपाई देण्यात यावी.

महावितरणच्या वतीने सदर तक्रार प्रकरणाबाबत लिखित स्पष्टीकरण दाखल करण्यात येवून आपल्या युक्तीवादात त्यांनी स्पष्ट केले की, सदर कामासाठी उच्चदाब वाहीनी 0.06KM, 63KVA विद्युत रोहीत्र व 0.10 km लघुदाब वाहीनी इ. कामाचा समावेश आहे. सबंधित ठेकेदाराने नोव्हेंबर २०१०

मंध्ये कामाला सुरुवात केली असून कामाची पुर्तता विद्युत निरिक्षक यांची मान्यता मिळताच विजजोडणी देण्यात येईल.

तक्रारप्रकरणातील दाखल करण्यात आलेली कागदपत्रे, उभयबाजुंनी झालेला युक्तीवाद आणि प्रकरणाची शहानिशा करता, शेतीपंपाच्या जोडणीस विलंब झालेला आहे. कोटेशन दिल्यानंतर ग्राहक जेव्हा पैसे भरतो, तिथून कार्यवाही होणे अपेक्षित आहे. वीज विधेयक २००३ मधील, कलम ४३ नुसार वीजजोडणीची कार्यपध्दती आणि विहित कालावधी स्पष्ट केलेला आहे. आणि यानुसारच नियामक आयोगाने आपल्या नियमावलीत कालावधी स्पष्ट केला असून काही विशिष्ट परिस्थितीत ६ महिन्यापर्यंतचा प्रलंबित काळ मान्य करण्यात आलेला आहे. पुरवठादार या नात्याने महावितरणवर नेमकी वस्तुस्थिती ग्राहकाला कळवण्याचे बंधनकारक असून जोडणी का देता आली नाही याचेही स्पष्टीकरण करणे आवश्यक आहे. महावितरणकडून याचे पालन होवू शकलेले नाही. तथापी कार्यपध्दतीचा भाग या नात्याने दि ०६.०२.२०१० आणि दि.०७.०५.२०१० च्या पत्रानुसार वस्तुस्थिती विषद केलेली आहे, जी नाकारुन चालणार नाही. तांत्रिक बाबींचा विचार करता महावितरणला कालावधी देणे आवश्यक असून उर्वरित काळाकरीता भरपाई देणे बंधनकारक आहे. कारण कृतीमानकाच्या अपयशाबद्दल भरपाई देणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.

प्रत्यक्ष सुनावणीत ८ दिवसामंध्ये वीजजोडणी देण्यात येईल असे स्पष्ट करण्यात आले असले, तरी सुद्धा वीज जोडणीची कृती झालेली नाही. ग्राहकाची निकड लक्षात घेता कार्यपध्दतीचा भाग तातडीने होणे गरजेचे आहे. वस्तुस्थिती विचारात घेता झालेल्या विलंबाचे कोणतेही संयुक्तीक कारण महावितरणकडून देण्यात आलेले नाही. मंचाच्या वरिल निष्कर्षानुसार पुढीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

# आदेश

**१. ग्राहकाची तक्रार मान्य करण्यात आली असून ग्राहकाने मागणी केल्यानुसार 3HP कृषीपंपाची जोडणी गट क्रमांक ६०९ येथे हा आदेश मिळाल्यापासून ८ दिवसात देण्यात यावी आणि विजपुरवठा सुरु करण्यात यावा.**

**२. नियामक आयोगाच्या नियमावलीनुसार ग्राहक कृतीमानकाच्या अपयशाबद्दल नुकसान भरपाई मिळणेस पात्र असल्याने भरपाईपोटी रु.२४००/- (रु.दोन हजार चारशे मात्र) हा आदेश मिळाल्यापासून १५ दिवसात देण्यात यावेत.**

**३. खर्च किंवा अन्य अनुषंगिक बाबतीत कोणताही आदेश नाही.**

४. आदेश क्र.१ व क्र.२ च्या बाबतीत कार्यवाही करुन पुर्तता अहवाल मंचाकडे २१ दिवसात दाखल करण्यात यावा.

५. या आदेशाविरुध्द ग्राहकांस अपील करावयाचे असल्यास खालील पत्त्यावर हा आदेश मिळाल्यापासून ६० दिवसात दाखल करता येईल.

<u>पत्ता :-</u>

सचिव,
लोकपाल महाराष्ट्र राज्य
विदयुत नियमक आयोग
६०६/६०८ केशवा बिल्डींग/
बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स मुबंई ४०००५१
फोन नं. ०२२ / २६५२९६५

| | | |
|---|---|---|
| श्री. डी. एस्. जामखेडकर | श्री. व्हि.बी.जगताप | श्री.एन्.ए.कुलकर्णी |
| अध्यक्ष | कार्यकारी अभियंता व सचिव | सदस्य |
| ग्रातनिमं, कोकण परिमंडल | ग्रातनिमं, कोकण परिमंडल | ग्रातनिमं, कोकण परिमंडल |

दिनांक :- ०२.०२.२०११
ठिकाण :- रत्नागिरी.